DATE / /

मोबाइल (कवियत्रि बहिणाबाई चौधरींची माफी मागून)

अरे मोबाइल मोबाइल असे सर्वांच्या हातात
आधी करता ऑर्डर तेंव्हा मिळे पिझ्झा आणि बर्गर।

अरे मोबाइल मोबाइल छोटा कधी म्हणू नये
ॲपल, समसंग, आणि मोबाइल खोटा कधी ठरवू नये।

अरे मोबाइल मोबाइल नाही हसणं बोलणं
येड्या हातातलं भार म्हणू नको रे लोढणं।

अरे मेसेज मेसेज असतो गोड गोड
वेळ जातो रे कसा नाही तुला कळत।

घरातली कामं सारी खोळंबून रे गेली
सख्याशी बोलता बोलता रात्र ही सरली।

ऑर्डर रे जेवण, पाणी पुरी, भेळ
खाऊन घ्या आरामात आज सारे आनंदात।

सिनेमा नि वेब सेरीज पाहू दिवसभर
मुलांना खाऊ जरी नसे पोटभर।

इन्स्टा आणि फेसबूकवर चॅटींगची रे चंगळ
घरच्यांना मिळे पाव आणि मिसळ।

अरे मोबाइल मोबाइल आहे मोठा जादुगर
साऱ्या जगाचा रे मित्र त्याच्यावरती मदार।

— सौ. विद्या कुलकर्णी.
वात्सल्यपुरम, कोथरूड
9823111406.